ट न न १	
दस्त क्र.६५१४	२०२२
११७	१८७

सहकार पणन व **वस्त्रोद्योग** विभाग,

उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे शहर यांचे कार्यालय ठाणे

गावदेवी मैदानाजवळ, गावदेवी मंडई इमारात, पहिला मजला, ठाणे (प) – ४००६०१

दुरध्वनी क्र २५४१६०६६ (०२२). ई- मेल आयडी – dyr.tna.thanecity@gmail.com

जा. क्र. उपनि/ठाणे शहर /बी-३/ गरोडीया हौ./पुनर्विकास/ परवानगी आदेश/ ४१२ /सन२०२२

दिनांक :-2/०५/२०२२

वाचावे :- १) सहकार, पणन व **वस्त्रोद्योग** विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय सगृयो २०१८/प्र.क्र.८५/१४-स,दि ०४/०७/२०१९.

२) अध्यक्ष/सचिव, गरोडीया को. ऑप. हौसिंग. सोसायटी लि., प्लॉट नं. ८९ बी,टी.पी.एस,पाईप लाईन रोड, लुईस वाडी, ठाणे (प) ता.जि. ठाणे या संस्थेचा दि.२६/०४/२०२२ रोजी चा प्रस्ताव.


३) या कार्यालयाकडील जा. क्र. उपनि/ठाणे शहर /बी-३/ गरोडीया हौ./ प्रा.अधि/वि.स.सभा/ ४०३/ सन २०२२ दि. २७/०४/२०२२ रोजीचे प्रधिकृत अधिकारी नियुक्ती आदेश.

४)प्राधिकृत अधिकारी यांचा दि.०२/०५/२०२२ रोजीचा अहवाल.

ज्याअर्थी, गरोडीया को. ऑप. हौसिंग. सोसायटी लि., प्लॉट नं. ८९ बी, टी. पी. एस, पाईप लाईन रोड, लुईस वाडी, ठाणे (प) ता. जि. ठाणे ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीनुसार नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था असून ती या कार्यालयाच्या अधिकार कक्षेत येत आहे. आणि,

ज्याअर्थी शासन निर्णय क्र. जा क्र. सगृयो २०१८/प्र.क्र.८५/१४-स, दि ०४/०७/२०१९. नुसार प्राप्त महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ (अ) अन्वये निदेशानुसार सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतीचा पुनर्विकास करणेसाठी विकासकाची निवड करण्याबाबत आयोजित करावयाच्या विशेष सर्वसाधारण सभेस प्राधिकृत अधिकारी नियुक्ती करण्याचे अधिकार तालुका निबंधकांना प्रदान केलेले आहेत. आणि,

ज्याअर्थी, विकासकाच्या नियुक्तीसाठी विशेष सर्वसाधारण सभा बोलविण्याकरीता प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती करणेबाबत संस्थेने वाचावे क्र.२ अन्वये प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुसार या कार्यालयाकडील वाचावे क्र.३ अन्वये सदर सभेस





उपस्थित राहणे करीता श्री. संजय शिंदे, सहकारी अधिकारी श्रेणी-२ यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे. आणि,

ज्याअर्थी सदर नियुक्ती आदेशास अनुसरुन या कार्यालयातील नियुक्त प्रधिकृत अधिकारी यांचे उपस्थितीत दि. ०१/०५/२०२२ रोजी संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा घेण्यांत आलेली आहे. प्रधिकृत अधिकारी यांनी दि. ०१/०५/२०२२ रोजी सदर सभेत झालेल्या निर्णया बाबतचा अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. आणि ,

ज्याअर्थी प्रधिकृत अधिकारी यांचे अहवालाचे अवलोकन केले असता त्यात नमुद केले आहे की संस्थेच्या दि. ०१/०५/२०२२ रोजी झालेल्या विकासक निवडीच्या विशेष सर्वसाधारण सभेत एकूण ५२ सभासदांपैकी ४७ सभासद सभेस उपस्थित होते पुनर्विकासासाठीच्या विशेष सर्वसाधारण सभेस आवश्यक असलेली २/३ गणपुर्ती पूर्ण झालेली असल्यामुळे सभा घेण्यात आलेली आहे. संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा दि.३०/०३/२०१६ नुसार संस्थेच्या पुनर्विकासासाठी मे. यश अशोका यांची विकासक म्हणून नेमणूक करण्यात आली होती. परंतु त्यानंतर संस्थेने केलेल्या पत्रव्यवहारास कुठल्याही प्रकारचा योग्य प्रतिसाद सदर विकासकाकडून मिळाला नाही तसेच वेगवगळया कारणामुळे विकसन करार सुध्दा पुढे ढकलण्यांत आला आहे. प्रतेक्षात इमारती जीर्ण होत आहेत त्यामुळे सर्व सभासदांन मध्ये एकच प्रकारचे भितीदायक वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे दि. ३०/०३/२०१६ च्या विशेष सर्वसाधारण सभेनुसार संस्थेच्या पुनर्विकासासाठी मे. यश अशोका यांची विकासक म्हणून केलेली नेमणूक संस्थेच्या विशेष सर्व साधारण सभा दि. २४/०४/२०२२ ठराव क्र.१ नुसार सर्वानुमते ठराव करुन रद्द केली आहे. तथापी सदर संस्थेच्या पुनर्विकासासाठी सदर सभेत उपस्थित ४७ सभासदांपैकी ४७ सभासदांनी ठरावाच्या बाजूनी संमती देवून सर्वानुमते विकासक निवडी बाबतचा ठराव मंजुर झाल्याचे दिसून आलेले आहे. सदर ठरावात विकासक म्हणून मे. वीर लाईफ स्पेसेस, एल.एल.पी वागळे इस्टेट, ठाणे (प) यांची सर्वानुमते निवड केलेली आहे. आणि,

त्याअर्थी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे सर्व प्रक्रीयेचे अवलोकन केले असता व अवलंबिलेल्या पध्दतीचा विचार करता संस्थेच्या पुनर्विकासासाठी विकासक म्हणून मे. वीर लाईफ स्पेसेस, एल.एल.पी वागळे इस्टेट, ठाणे (प) यांची निवड झालेली आहे.सदर नियुक्तीस मान्यता देणे आवश्यक असल्याची माझी खात्री झालेली आहे त्यामुळे मला प्राप्त अधिकरानुसार मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.



-:आदेश :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ (अ) व सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय सगृयो २०१८ / प्र.क्र. ८५/ १४-स, दि ०४/०७/२०१९. चे शासन निर्देशान्वये प्राप्त अधिकारानुसार मी विशाल

ठाणे १	
दस्त क्र. ६५१४	२०२२
११९	१७७

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR THANE NO. 1 सह. दुय्यम निबंधक ठाणे क्र. १ यांची मोहर सत्यमेव जयते जि. ठाणे DIST. THANE

जाधवर, उपनिबंधक, सहकारी संस्था ठाणे शहर गरोडीया को. ऑप. हौसिंग. सोसायटी लि., प्लॉट नं. ८९ बी, टी. पी. एस, पाईप लाईन रोड, लुईस वाडी, ठाणे (प) ता. जि. ठाणे या संस्थेच्या इमारतींच्या पुनर्विकासास परवानगी देत असून विकासक म्हणून मे. वीर लाईफ स्पेसेस, एल.एल.पी वागळे इस्टेट, ठाणे (प) यांची निवड झालेली असल्याने सदर नियुक्तीस मान्यता देत आहे.

सदर आदेश आज दि.2/०५/२०२२ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिला असे.

ठिकाण : ठाणे
दिनांक : 2/०५/२०२२

(विशाल जाधवर)
उपनिबंधक,
सहकारी संस्था,ठाणे शहर

प्रत :-

१) मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका

२/- आपणांस विनंती करण्यांत येते की, पुनर्विकास करण्यासाठी सदर संस्थेने /विकासकाने आपले कार्यालयाकडे प्रस्ताव दाखल केल्यास रितसर सदरचा प्रस्ताव मंजुर करण्यास या कार्यालयाची हरकत नाही.

२)अध्यक्ष / सचिव गरोडीया को. ऑप. हौसिंग. सोसायटी लि., प्लॉट नं. ८९ बी, टी. पी. एस, पाईप लाईन रोड, लुईस वाडी, ठाणे (प) ता. जि. ठाणे

२/- आपणांस कळविण्यांत येते की, संस्थेच्या इमारतींच्या पुनर्विकासानंतर संस्थेतील वाढीव सदनिका / गाळयांना सभासदत्व देण्यापुर्वी संस्थेच्या अधिकृत भागभांडवलात वाढ करण्यासाठी या कार्यालयाकडे भागभांडवल वाढीचा रितसर प्रस्ताव दाखल करुन परवानगी घेण्यांत यावी.

३)मे. वीर लाईफ स्पेसेस, एल.एल.पी, वागळे इस्टेट, ठाणे (प)

२/- आपणांस कळविण्यांत येते की, संस्थेच्या इमारतींच्या पुनर्विकासानंतर संस्थेतील वाढीव सदनिका/ गाळयांची विक्री केल्यानंतर तसे संस्थेस अवगत करुन संस्थेमार्फत भागभांडवल वाढीचा प्रस्ताव या कार्यालयास सादर करावा.

उपनिबंधक,
सहकारी संस्था,ठाणे शहर

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे शहर, यांचे कार्यालय

गावदेवी मंडई इमारत, 1 ला मजला, गांवदेवी मंदिर मार्ग, गावदेवी मैदानाजवळ , ठाणे (प) ता. जि. ठाणे
दुरध्वनी क्रं. 25416066 e-mail ID- dyr.tna.thanecity@gmail.com

जा.क्र.उपनि/ठा.श./बी-३/हौसो/शु.प./१९९६/सन२०२३
दिनांक :- 23/०८/२०२३

ट न न १	
दस्त क्र६५१४	२०२३
१२०	१७७

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR THANE NO. 1 DIST. THANE

शुध्दीपत्रक

विषय :- पुनर्विकासाबाबत दिलेल्या आदेशात दुरुस्ती करण्याबाबत...
संदर्भ :- १) या कार्यालयाकडील आदेश जा.क्र. ४८२ दि. ०२/०५/२०२२.
२) संस्थेचे दि. १२/०८/२०२३ रोजीचे पत्र.

गरोडिया को. ऑप. हौसिंग सो. लि., प्लॉट नं. ८९बी, टीपीएस, पाईप लाईन रोड, लुईसवाडी, ठाणे (प) या संस्थेस पुनर्विकासाबाबत संदर्भ क्र. १ अन्वये देण्यात आले होते. सदर आदेशात संस्थेचा पत्ता **"गरोडिया को. ऑप. हौसिंग सो. लि., प्लॉट नं. ८९बी, टीपीएस, पाईप लाईन रोड, लुईसवाडी, ठाणे (प)"** असा नमूद केलेला आहे. तथापी, संस्थेच्या विनंती अर्जावरुन व सादर केलेल्या मालमत्ता पत्रकानुसार त्या ऐवजी **"गरोडिया को. ऑप. हौसिंग सो. लि., अंतिम भुखंड क्र. टीपी स्कीम ०१-१०१, पाईप लाईन रोड, लुईसवाडी, ठाणे (प)"** असे वाचावे.

(डॉ. अविनाश भागवत)
उपनिबंधक
सहकारी संस्था, ठाणे शहर

प्रत :-
अध्यक्ष/सचिव,
गरोडिया को. ऑप. हौसिंग सो. लि.,
अंतिम भुखंड क्र. टिपी स्कीम ०१-१०१, पाईप लाईन रोड,
लुईसवाडी, ठाणे (प)

GARODIA CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD. [REGD.]

गरोडीया को.-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि. (रजि.)

REGN. NO. TNA/(TNA)/HSG/(TC)/12019/2000

Plot No. 89B, T.P.S., Pipe Line Road, Louis Wadi, Thane (West), Pin Code 400 604.

Ref.:

Date: ८ जा २

दस्त क्र. ६५१४ | २०२३

९२१ | ९८८

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR THANE No. 1 सह. दुय्यम निबंधक ठाणे क्र. १ ठाणे DIST. THANE

ठराव

सर्वानुमते ठराव करण्यात येतो की, दि. ३०/०१/२०२० रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेतील अध्यक्षांच्या परवानगीने घेण्यात आलेल्या विषयांवर चर्चा होऊन ठाणे महानगरपालिकेमध्ये सोसायटी पुर्नविकासासाठी प्रस्ताव दाखल करून व दाखल विकास प्रस्तावास संदर्भीय कार्यासाठी गरोडीया को. ऑ. हौ. सोसायटीच्या कमिटीतर्फे अध्यक्ष, श्री. मदन आठवले व सचिव, सौ. सविता दुधे, डी. एस.राणे यांना सर्व अधिकार देण्याबाबतचा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला आहे. सदर ठरावानुसार उपस्थित सर्व सभासदांनी स्वाक्षरी केली आहे.

सुचक : श्री. विजय गुजर

अनुमोदक : श्री. गोवरी शंकर हरिहरन चित्तोर

ठराव सर्वानुमते मंजुर

For Garodia Co-operative Housing Society Ltd.

Chairman Secretary Treasurer